Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VII ISSUE- VI JUNE 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या क्रीडाविषयक आर्थिक समस्यांचा तुलनात्मक अभ्यास

**बाजीराव भागवत इंगोले**
रा. आ. कला, श्री. मि. क. वाणिज्य व
श्री. स.रा.रा. विज्ञान महाविद्यालय, वाशिम

**डॉ. महेशचंद शर्मा**
निर्देशक व विभाग प्रमुख,
शारीरिक शिक्षण विभाग,
गुरूनानक विज्ञान महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

## १.० प्रस्तावना

शारीरिक शिक्षण हा शिक्षणाचाच एक भाग आहे, त्यामुळे शारीरिक शिक्षणाला शिक्षणापासून वेगळे करता येणार नाही, माणसाला दोन प्रकारे अनुभव मिळतात, बुद्धीद्वारे व दुसरे शारीरिक हालचालीद्वारे. शारीरिक शिक्षण हे शारीरिक हालचालीचे शिक्षण असले तरी त्यामध्ये मस्तिष्काचा वापर करावा लागतो, म्हणजे शारीरिक शिक्षण हे बौद्धिक शिक्षणाशिवाय पूर्ण होत नाही किंवा साध्य करता येत नाही. शारीरिक शिक्षणाचे ध्येय सामान्य शिक्षणाच्या ध्येयापेक्षा वेगळे नाही. पण ते ध्येय साध्य करण्याचे माध्यम वेगळे आहे. ते म्हणजे शारीरिक शिक्षणाचे वेगवेगळे कार्यक्रम. शारीरिक शिक्षण हे शिक्षणाचेच नव्हे तर जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे. शारीरिक शिक्षणाचा उद्देश केवळ शरीराला सुदृढ, सक्षम व आरोग्यदायी करणे एवढया पुरता सिमीत नसून शरीराबरोबर मानवी मन व बुद्धीला योग्य दिशेने चालना देऊन विद्यार्थ्यांचा समस्त व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हे आहे. अंगातील उत्साह धैर्य, आत्मविश्वास, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती, नेतृत्व, आज्ञाधारकपणा, शिस्त जीवनाकडे व जगाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचे कार्य शारीरिक शिक्षणामुळे होते.

शिक्षणाची मुलभूत उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी तसेच जागतिकीकरणाने उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण केलेल्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी देशातील महाविद्यालय व शैक्षणिक संस्था सर्व दृष्टीने सक्षम होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी नव्या पिढीला कालानुरुप गुणात्मक, विकासात्मक व मुल्यात्मक शिक्षण देणारी यंत्रणा, प्रशिक्षित शिक्षक व मानवी संस्थाधने उभी करणे ही काळाची गरज आहे. दर्जेदार खेळाडू तयार करतांना पैशाची अडचण फार मोठी आहे. आधुनिक क्रीडा साहित्य, सोयी, प्रशिक्षण, आहार, प्रवास खर्च, स्पर्धांचे आयोजन जास्तीत जास्त क्रीडा स्पर्धेत सहभाग इ. सर्व गोष्टींना आर्थिक सहाय्य आवश्यक असते. बरेचदा शासनाच्या योजना असूनही आर्थिक मदत खेळाडूंपर्यंत पोहचत नाही. याकरीता संशोधनासाठी विदर्भाच्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या क्रीडाविषयक आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## २.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्याकरीता सर्वेक्षण पद्धतीचा प्रयोग करण्यात आला.

### २.१ नमूना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनाकरिता चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील एकूण ३६० खेळाडूंची निवड सहेतुक यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. यामध्ये चंद्रपूर जिल्हयातून १८० व गडचिरोली जिल्हयातून १८० असे ३६० खेळाडू निवडण्यात आले. प्रस्तुत संशोधनात खो–खो, कबड्डी, हॉकी, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल व क्रिकेट खेळाच्या जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड करण्यात आली.

### २.२ तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनकार्यात तथ्य संकलनासाठी प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविण्यात आली.

### २.३ तथ्य संकलनाची माध्यमे आणि प्रक्रिया :

प्रश्नावलीची निर्मिती मार्गदर्शकाच्या निर्देशनामध्ये करण्यात आली व सोबत या विषयाचे विशेषज्ञ व व्यवसायिक व्यक्तिंचा सल्ला घेण्यात आला.

प्रश्नावलीचे निर्मिती हेतु निवडक पुस्तके व साहित्याची मदत घेतल्या गेली. निर्मिती प्रश्न तांत्रिक व सुव्यवस्थित पद्धतीने मांडून प्रश्नांची रूप रेषा सर्व साधारण, सरळ, स्पष्ट ठेवण्यात आली. प्रस्तुत संशोधनात माहिती एकत्रीत करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला.

२.४ सांख्यकिय विश्लेषण

प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन सांख्यकिय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता, प्रतिशत प्रमाण व बहुलक काढण्यात आले.

३.० सांख्यिकीय विश्लेषण

३.१ कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर

सारणी क्र. १: खेळाडू राहत असलेल्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | २० | १६.७ | ४६ | ३८.३ | ५९ | ४९.२ |
| मध्यम | ७४ | ६१.७ | ५७ | ४७.५ | ४२ | ३५.० |
| उच्च | २६ | २१.७ | १७ | १४.२ | १९ | १५.८ |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. १ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमानाच्या स्तराबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे १६.७ टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर निम्न असून ६१.७ टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमान मध्यम स्वरूपाचा होता. त्याचप्रमाणे २१.७ टक्के खेळाडू राहत असलेल्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर उच्च असल्याचे आढळले.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ३८.३ टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर निम्न असून ४७.५ टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमान मध्यम स्वरूपाचा होता. त्याचप्रमाणे १४.२ टक्के खेळाडू राहत असलेल्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर उच्च असल्याचे आढळले.
- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ४९.२ टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर निम्न असून ३५.० टक्के खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमान मध्यम स्वरूपाचा होता. त्याचप्रमाणे १५.८ टक्के खेळाडू राहत असलेल्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर उच्च असल्याचे आढळले.

३.२ स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

सारणी क्र. २: खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | ७९ | ६५.८ | ५३ | ४४.२ | ३६ | ३०.० |
| नाही | ४१ | ३४.२ | ६७ | ५५.८ | ८४ | ७०.० |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. २ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे ६५.८ टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळते तर ३४.२ टक्के खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे आढळले.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर

खेळणारे ४४.२ टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळते तर ५५.८ टक्के खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे आढळले.

- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ३०.० टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळते तर ७०.० टक्के खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे आढळले.

३.३ स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होण्याबाबत

सारणी क्र. ३: स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | १८ | १५.० | ४८ | ४०.० | ७६ | ६३.३ |
| नाही | १०२ | ८५.० | ७२ | ६०.० | ४४ | ३६.७ |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. ३ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे १५.० टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होतात तर ८५.० टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत नाही.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ४०.० टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होतात तर ६०.० टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत नाही.
- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ६३.३ टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होतात तर ३६.७ टक्के खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत नाही.

३.४ आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते

सारणी क्र. ४: आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | ६९ | ५७.५ | ७१ | ५९.२ | ९२ | ७६.७ |
| नाही | ५१ | ४२.५ | ४९ | ४०.८ | २८ | २३.३ |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. ४ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे ५७.५ टक्के खेळाडूंप्रमाणे आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते तर ४२.५ टक्के खेळाडूंच्या मते आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत नाही.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ५९.२ टक्के खेळाडूंप्रमाणे आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते तर ४०.८ टक्के खेळाडूंच्या मते

आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत नाही.

- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ७६.७ टक्के खेळाडूंप्रमाणे आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते तर २३.३ टक्के खेळाडूंच्या मते आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत नाही.

३.५ स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते

सारणी क्र. ५: स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | ६८ | ५६.७ | ८४ | ७०.० | ७२ | ६०.० |
| नाही | ५२ | ४३.३ | ३६ | ३०.० | ४८ | ४०.० |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. ५ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे ५६.७ टक्के खेळाडूंप्रमाणे स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते तर ४३.३ टक्के खेळाडूंच्या मते स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत नाही.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ७०.० टक्के खेळाडूंप्रमाणे स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते तर ३०.० टक्के खेळाडूंच्या मते स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत नाही.
- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ६०.० टक्के खेळाडूंप्रमाणे स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते तर ४०.० टक्के खेळाडूंच्या मते स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत नाही.

३.६ उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन कराण्याबाबत

सारणी क्र. ६: उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | २५ | २०.८ | ४० | ३३.३ | १० | ८.३ |
| नाही | ९५ | ७९.२ | ८० | ६६.७ | ११० | ९१.७ |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. ६ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे २०.८ टक्के खेळाडूंच्या मते त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागते तर ७९.२ टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत नाही.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ३३.३ टक्के खेळाडूंच्या मते त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री

याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागते तर ६६.७ टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत नाही.

- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ८.३ टक्के खेळाडूंच्या मते त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागते तर ९१.७ टक्के खेळाडूंप्रमाणे त्यांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत नाही.

३.७ क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते

सारणी क्र. ७: क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | जिल्हा स्तर | | राज्य स्तर | | विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| होय | ८७ | ७२.५ | ९० | ७५.० | १०८ | ९०.० |
| नाही | ३३ | २७.५ | ३० | २५.० | १२ | १०.० |
| एकुण | १२० | १००.० | १२० | १००.० | १२० | १००.० |

सारणी क्र. ७ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- जिल्हा स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार जिल्हा स्तरावर खेळणारे ७२.५ टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते तर २७.५ टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत नाही.
- राज्य स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार राज्य स्तरावर खेळणारे ७५.० टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते तर २५.० टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत नाही.
- विद्यापीठ व राष्ट्रीय स्तर खेळाडू: वरील सारणीमध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे ९०.० टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते तर १०.० टक्के खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत नाही.

## ४.० निष्कर्ष

### ४.१ राहत असलेल्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या राहणीमानाच्या स्तरामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा व राज्य स्तरावर खेळणारे खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमानाचा स्तर मध्यम असून विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंच्या कुटुंबाचा राहणीमान उच्च स्वरूपाचा आहे.

### ४.२ स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर खेळणारे खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळते तर राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर

खेळणारे खेळाडूंना स्पर्धेस सहभागी होतांना कुटुंबाकडून आर्थिक सहाय्य मिळत नाही.

४.३ स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होण्याबाबत

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना येणाऱ्या आर्थिक समस्यांमध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा व राज्य स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होत नाही तर विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होत असतांना आर्थिक समस्या निर्माण होतात.

४.४ आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंना आर्थिक समस्या सोडविण्यासाठी क्रीडा/इतर संस्थेकडून मदत मिळते.

४.५ स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंप्रमाणे स्पर्धेतील आर्थिक खर्चामुळे कुटुंबांना तडजोड करावी लागते.

४.६ उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करण्याबाबत

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंना उच्च प्रतिचे प्रशिक्षण, योग्य क्रीडा सामुग्री याकरीता आर्थिक बोझा सहन करावा लागत नाही.

४.७ क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते

- संशोधनकार्यात प्राप्त परिणामांनुसार असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विभिन्न स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे जिल्हा, राज्य, विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर खेळणारे खेळाडूंना क्रीडा संघटनांमार्फत या क्रीडा प्रकारांकरीता आर्थिक मदत प्रदान करण्यात येते.

५.० संदर्भ ग्रंथ सुची

1. कंवर, आर. सी. (१९९५).''शारीरिक शिक्षा के सिद्धात एवं इतिहास'', अमित ब्रदर्स पब्लिकेशन्स, नागपूर, पृ.क्र. २२—२३.
2. कासट, ग. (१९९०). विदर्भातील माध्यमिक शाळेत राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण कार्यक्रमाचे अध्ययन, शिक्षण शाखेत आचार्य पदविचा शोध प्रबंध, नागपूर विद्यापीठ, शैक्षणिक संशोधनाचे पाचवे सर्व्हेक्षण छब्म्त्ज नवी दिल्ली, पृष्ठ क्र.१३१४.
3. कुमारन डी. (१९९९) 'शिक्षणाच्या शारीरिक क्षमता व शैक्षणिक कार्य करण्याच्या क्षमतांचे अध्ययन' इंडीयन एज्युकेशन ॲबस्टॅक्ट छब्म्त्ज व्हाद्मा — ३ जुलै २००३.
4. भितांडे, व्ही. आर. (१९९४). शैक्षणिक संशोधन पद्धती' नूतन प्रकाशन, पुणे.

5. हरिशप्रसाद (१९८७). मार्गदर्शक के. एस. पांधरवाला, बिलिवोग्राफिकल डेझर्टेशन अॅबस्ट्रॅक्ट, अमरावती युनि., बॅचलर आफॅ फिजिकल एज्यु., प्रशासक सचिव एच.व्ही.पी. एम., अमरावती (१९९०) संपादक – डॉ. व्ही. एम. वैद्य, अशोक कुमार झा, पान नं. २२
6. पुनैय्या, ल. ई. (२००६). ''विदर्भातील विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व खेळ सुविधाचे अध्ययन आणि त्याचा खेळ प्रदर्शनावर होणारा परिणाम एक विश्लेषणात्मक अभ्यास'', पे.नं. १७३–१७४.
7. वाखारकर, दि.गो. (२००६). "शारीरिक शिक्षा का आधुनिक स्वरुप तथा अध्ययन" पान क्र. ७–१२.
8. भालेराव सु., (२००३), 'आंतर विद्यापीठ क्रीडास्पर्धात भाग घेणाऱ्या महिला खेळाडूंसमोर उत्पन्न होणाऱ्या समस्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास', अप्रकाशित शोधप्रबंध, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.
9. काणे डी.बी.,(१९८१),''नागपुर के विभिन्न खेलो के खिलाडियों की समस्याओं का अध्ययन'', शारीरिक शिक्षण पारंगत पदवी के लिए नागपूर विद्यापीठ में प्रस्तुत, पे.५१–५५.,
10. मेश्राम वं., (१९९२–९३), यांनी ''नागपूर शहरातील विना अनुदान तत्वावर चालणाऱ्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाची सद्यस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास एम.पी. एड. परिक्षेकरीता नागपूर विद्यापीठात सादर केलेला लघुशोध प्रबंध''पृ. १०, १६, ५५, ५६